# घोषणांचे वादळ

नामदेव शिंदे



**घोषणांचे वादळ** (कवितासंग्रह)

(Ghoshanche Vadal)

**डॉ. नामदेव विठ्ठल शिंदे**

(eBook)


- **प्रकाशक : नामदेव विठ्ठल शिंदे,**
  **मु.पो.रोपळे, ता. पंढरपूर,**
  **जि. सोलापूर ४१३ ३०४**



© **डॉ. नामदेव विठ्ठल शिंदे**
**मु.पो. रोपळे, ता. पंढरपूर,**
**जि. सोलापूर ४१३ ३०४**



**मोबा : ९८५०१२५५८४**



- **प्रथमावृत्ती: २२ सप्टेंबर २०२१**
- **मुखपृष्ठ : पारस ग्राफिक्स**
- **अक्षरजुळणी : टी.व्ही. मस्के**
- **मुद्रक : व्हीजन ऑफसेट**
- ISBN - (ebook) 978-93-5619-993-4
- **पृष्ठसंख्या : ६३**
- ₹ : १००

## अनुक्रमणिका


१. घोषणांचे वादळ
२. मेंदुत पाणी झालेल्या अनुयायांनो!
३. हात
४. महान उभ्या हया महाराष्ट्रात!
५. देणं फेडताना
६. गुळपाणी
७. साहित्यिकाची नजर
८. बोकडं
९. आजच्या काळाची स्पंदनं
१०. वैचारिक जत्रा
११. तफावत
१२. किर्र किर्र
१३. सगळं कस वरवरचं खोटं
१४. उस्फूर्त
१५. अजून थोडया क्षणापुरतं
१६. हुंदडत चाललेली चळवळ
१७. कामगारांनो!
१८. कामधंदा
१९. विश्वासघात
२०. निसर्ग
२१. कीर्ती
२२. इशारा
२३. बेरोजगारांचा महामेळा
२४. भारत हा सत्ताकारण देश आहे
२५. शेतकऱ्यांनो तुम्हीच बना...
२६. मेंदू नसणारी माणसे...
२७. खेडे व शहर : भाग १
२८. खेडे व शहर : भाग २
२९. आत्महत्येचं पीक

३०. पावसासारखं...
३१. रसानं
३२. काळे कावळे आणि पांढरे बगळे
३३. डिजिटलावरली माणसं
३४. मातीतून
३५. रस्त्यांची तहान
३६. खोडवा ऊस
३७. इथं
३८. स्वप्नं
३९. मातीच्या राजा
४०. शिक्षक
४१. फक्त
४२. जागतिकीकरणानं
४३. केला प्रयत्न
४४. षंढ
४५. नोंद

## 1. घोषणांचे वादळ

सतत होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमुळं
सत्तेची खुर्ची जाणार की काय,
या धास्तीनं
सरकारनं घोषणांचे सोडलं वादळ

विदर्भ, मराठवाडा, खानदेश फिरत फिरत
ते आलं पश्चिम महाराष्ट्रातही

जखमा इतक्या खोल होत्या की,
त्या घोषणांच्या वादळांची फुंकर तितपर्यंत पोहचली नाय
दिल्लीवरनं सोडलेलं वादळ
फिरत फिरत पश्चिम महाराष्ट्रातील-
सोलापूरातील-पंढरपूरातील-शेपळयातील
शेतकऱ्यांच्या घरी आलं
तेव्हा ते क्षणभराची झुळूक होऊन

मग रागाला येऊन,
सुशिक्षित बेकार शेतकरी ओरडला,
बंद करा! वादळे सोडणे, मलमपट्टया पॅकेजच्या,
कर्जमाफीच्या घोषणा

काहीतरी कायमचा उपाय शोधा
आमच्या जीवघेण्या यातनांवर

त्यासाठी संशोधन करा

पण, त्यातही वादळाची झुळूक होणार नाही कशावरून!

•••

## 2. मेंदुत पाणी झालेल्या अनुयायांनो!

धर्मरक्षणाच्या नावाखाली
लाच गोळा करताना
प्रत्येकानं हजार रूपयं दिलचं पाहिजित
असा हेका लावत फिरतात अनुयायी दारोदारी

काल,
साजरी करताना शिवजयंती
पाहिले मी,
तथाकथित शिवसैनिक-
पिऊन टर्र... उड्या मारताना
तोडांत माव्याचा न मावणारा घास
प्रत्येक गल्लीतनं जातो पचापच थुंकत
डीजेच्या तालात

मी म्हटलं,
अरं भडविच्यांनो!
आता तर सुधारा तुम्ही
हे नव्हतं सांगितल छत्रपतींनी कराया

मग काय करू?
डीजेच्या तालावर नाचणाऱ्या घोळक्यातनं आला आवाज

शिवरायांना आधी सबंध वाचा

त्यांचे पसरावा विचार समाजात
मीही त्यांच्यावर फणकरताना
धापापत्या उरानं एकजण म्हणाला,
लई शाना हाईस,
तुच आधी सुधार!

शिकला तेवढा हुकला
कुश्चित नजरेच्या डाव टाकत माझ्याकडं पाहतं
म्हणाला, दुसरा अनुयायी

काल परवा नाचत होते भीमसैनिकही गल्लीगल्लीतनं
मिरवणुक कुठनं न्यायची ह्याची भांडाभांड
करत ती जात होती पुढं बोळाबोळातनं

बेहोष, रंगाने, घामाने न्हाऊन निघालेले
तथाकथित भिमसैनिक-
आपण श्याने आहोत हाच ताल होता नाचण्यात
लहान लेकरू हेच पाहतं होतं
आन् भविष्यात अशाच मिरवणुका रंगविण्यात
स्वप्न त्याचं झोपत होतं

अनुयायांची मिरवणुक आठवड्याभरात सरली
पण, दाघा कांबळ्या अजूर शिवारात सालानं झिजतूया
ही पुण्याई मिरवणुकीची म्हणतं मनातनं
मुलांच्या शिक्षणासाठी कवा बापानं

नाही काढलं कर्ज
पण अनुयायांच्या धाकापायी
सावकाराकडं दिला व्हता अर्ज
नाही दिली तर वर्गणी
समाज करील तुझ्यावर बहिष्काराची करणी

भोसडीचे अनुयायी!
मागच्या बारीला भांडत होते ह्या ना त्या कारणावरनं
आन् त्याच दंगलीतनं येत होता आवाज
जय भवानी... जय शिवाजी....
दुसरीकडं -
जय भीम.... जय भीम.....

अजाण रात्री मी पाहिलं ह्या सगळ्या महापुरूषानां
रडताना,
गळ्यात गळा घालून एकमेकांच्या
भीमरावही हुमसून हुमसून रडत होते
शिवरायांच्या कुशीत
भारताचे संविधान शिवरायांच्या हातात देऊन
डोळे पुशीत
भीमरावांनी घेतला हाती लगाम
घेतली हाती तलवार
परत अनुयायांना करण्यासाठी गुलाम
म्हणाले, अडवत शिवराय
आपणच चुक केली ह्या जन्मभूमीत जन्माला येऊन

एकेका महापुरूषांना घेतले वाटून अनुयायांनी
कुणी फुले, कुणी शिवराय
तर कुणी आंबेडकर
आन् उभ्या केल्या त्यांच्याच नावानं संघटना

तवा तर –
गेलेला जीवच द्यायला निघाले सगळे महापुरूष!
मनात रागाचा महासागर उसळला
म्हटलं,
आता तरी समजून घ्या?
मेंदुत पाणी झालेल्या अनुयायांनो
महापुरूषांनी नेमका दिला कोणता संदेश.....

•••

३. हात

विचारांत मग्न असताना
जाणवले, आपले हात खरंच आहेत सुंदर
कुणब्याच्या मुलाचे नसतात असे हात
पण आपुन तर कुणब्याच्याच पोटचे!

आई-बानं उपसलं कष्ट रानात बारमाही
त्याचा अर्थ लागला पाहून हाताकडं
डोळ्यातनं थेंब पडायले हातावरही
मनाचे अंग लागले दुःखाया
पण, त्यावर कोणताच ईलाज नव्हता हाताचा
शिवाय आईच्या ---

•••

4. महान उभ्या ह्या महाराष्ट्रात !

सूर्यासमवेत तळपतो महाराष्ट्र अमुचा देशात
माय मराठीची पताका भिरभरते गगनात
चांद्यापासून बांद्यापर्यंत,
सकळ जनांचे ऐक्य साधले महाराष्ट्रात

शिवराय-फुले-शाहू-आंबेडकरांसह
थोर परंपरा संतांची या भूमीला
विकासाच्या आधुनिक युगातील वाऱ्यासह
स्वच्छ सुंदर निसर्ग ह्या दिमतीला

लाभली परंपरा ही थोर संस्कृतीची
धर्म-राजकारण-अर्थकारण-समाजकारणाचीही
गलिच्छांच्या डब्याला वेसन सर्वसामान्यांच्या लोकशाहीची
यामुळेच झाल्या, उज्ज्वल सर्व दिशा महाराष्ट्रात

शेतकरी राजा उभा सबंध महाराष्ट्रात
जगवी सगळ्यांना आनंदात
शिक्षणाची दारे सताड पडली खुली
कोणतही नसे दुजाभाव विकासात
स्थापण्या सुख-शांती -समृद्धी-बंधुभाव
उभा महान महाराष्ट्र भारतात
उभा महान महाराष्ट्र भारतात !!

•••

## 5. देणं फेडताना

तयार होत नाही कधीच
बदलायला सूर्य !
रोजचा दिस सारखाच
काय त्या शेअरबाजाराचं
        निर्देशांकाचं
        क्रिकेटचं
किंबहुना राजकारण्यांचही

आतड्याला पिळ पाडू पाडू
राबणाऱ्या बापाचं
पोट आणि पाट
होत आलयां एक
सावकाराचं फेडताना कर्ज

मह्या आईचा दुःखाचा पूर
कितीही मांडला काव्यातनं
तरीही,
आईच्या हाताचं कष्ट होत नाही कमी
बँकेचं फेडताना कर्ज

धाकट्या दोन भावांच्या शिक्षणासाठी
थोरल्यानही उडी हाणली दरीत बापासंग
तरूणपणातच म्हाताऱ्याचं रूप

दिलं त्याला जमिनीनं
तो कधी जगलाच नाही
सोसायट्याचं फेडताना कर्ज

म्हया बापाची पहिली पिढीही
अशीच गेली,
राबताना मातीत
आन् मलाही झिजवाया
बघतीया ही व्यवस्था
समाजाचं फेडताना ऋण...

•••

6. गुळपाणी

दररोज उन्हात राबून राबून
शरीर झालयं,
वाऱ्याच्या झुळकीवर उडणाऱ्या पाचराटसारखं

काम करताना उन्हात
म्हणतात सगळेच,
फक्त रक्ताचं होतय घामात रूपांतर
मिशिनीसारखं
दुसरा काहीच फायदा नाय

सरकार म्हणतयं,
आमच्या देशात सगळं बरय पीकपाणी
पण शेतकरी राजा दररोज झोपतोय पिऊन गुळपाणी.

•••

7. साहित्यिकाची नजर

सगळेच घाबरतात साहित्यिकांच्या नजरेला
विशेषतः स्त्रिया
थोड्याशा प्रमाणात पुरूषही

एकदा भरला नजरेत स्त्रीदेह साहित्यिकाच्या
तो उतरला पानांपानात सर्व खाणा-खुणांसह

पुरूषही नीट वागतात साहित्यिक मित्राशी
कारण,
कदाचित आपलही वर्णन येईल गुण-अवगुणांसह...

•••

४. बोकडं

शेतकरीत्तोरांचे बोकडं असते
एक पाळीव प्राणी फक्त
वाटलसं तर पार्टी करायचं साधन

पण,
शेतकरी लहानपणापासनं जगवतो बोकडाला
कधी येऊ नये म्हणून अडचण

पण,
लोकशाहीत सतत अडचणी येणार हे निश्चितच
गृहित धरून
अडीअडचणीला विकले जाते खाटकाला बोकडं
त्याचा येणारा पैसा वळवला जातो
घराकडं, थोडाबहुत शिक्षणाकडं

म्हणजेच,
बोकडं म्हणजे संकटातून सोडवण्याची एक वस्तूच.
पशुहत्या करू नको
असं म्हणणाऱ्याला,
आमच्या अडचणी उत्तर देऊ शकत नाहीत
त्यासाठी,
आम्हाला अंधश्रद्धाळू-पापी ठरवून
तुम्ही विचारा सत्ताधाऱ्याला पाय धरून.

•••

९. आजच्या काळाची स्पंदनं

लिहिली असती उच्चविद्रोही कोटीतली कविता,
नामदेव ढसाळांसारखी
पण,
गोलपिठ्यात राहण्याचा अनुभवच आला नाही आमच्या वाट्याला

फोडला असता उच्चकोटीतला हंबरडा
दया पावारांसारखा
पण,
कोंडवाडा आला नाही कधी आमच्या वाट्याला

दिल्या असत्या उच्च आवाजात घोषणा चौकाचौकात
शरद जोशीसारख्या
पण,
भ्रष्टाचाररहित चळवळी येत नाहीत आमच्या वाट्याला

पण...., नक्कीच मी
उच्चकोटी विद्रोहातला हंबरडा फोडणार आहे
घोषणे प्रमाणे,
आजच्या काळातील समस्यांचे स्वरूप ओळखून...

•••

10.वैचारिक जत्रा

आता, बंद करा भरवणे वैचारिक जत्रा
थोडे सुधारण्यासाठी घ्या समाजसुधारकांची मात्रा
राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय
अशी नावे देऊन फक्त,
खुशाल करतात अनुदान फस्त

एकमेकांना भेटायचं ठिकाण झालयं चर्चासत्राचं
मग कसं वाटोळ होणार नाही निधीचं

पहिल्या सत्राच्या अगोदरच,
चहा-बिस्किटाची मेजवाणी
नंतर कशी ऐकू आम्ही संयोजकाची वाणी

दुपारी जेवल्यानंतर,
झोपण्या-ऐकण्याचा मिश्रित आनंद घेण्याची
रीतच झालीय चर्चासत्राची

वेळ फक्त अर्धा तास होता एक सत्राला
वक्ते होते एकूण नऊ, अध्यक्षांसह त्याच सत्राला
वेळ नाही हेच प्रत्येक वक्ता बोलत होता
पण, एवढं मात्र निश्चित
संयोजकाचं नियोजन चुकलं हे तेव्हा कळलं
की, हे चर्चासत्र आहे तिसरं

वैचारिक चर्चेपेक्षा परिचयचं जास्त झाला
वेळ कमी असताना सुद्धा
म्हणूनच मी म्हटलं,
एकदाच परिचयाचं चर्चासत्र भरवून टाका,
म्हणजे परत परत नको परिचय करून द्यायला

गावाकडं जाताना मित्र स्टॅन्डवर दिसला
मोठा आवाज करून
हाक दिली मित्राला
"एवढ्या घाई-गडबडीनं चाल्लास रं कुठं?"
तो म्हणाला,
"अरं, सरस्वती कॉलेजात राष्ट्रीय चर्चासत्राय,
जरा जेवणात बदल करून येतो
मेसचं खाऊन लईच कंटाळा आलायं"

शेवटच्या समारोप सत्राला
भरला होता सगळा मॉल
एकानं विचारलं,
शेवटाला वढा कसा इंट्रेस आला चर्चासत्राला
दुसरा,
"कुठलां इंट्रेस-बिंट्रेस नाय
सर्टिफिकेटसाठी सगळे जमले हायत."

शेवटी

चवताळलेला शेतकऱ्याचा एक पोऱ्या म्हणाला,

त्या विद्यापीठाच्या आयला.......

बुडवला पंचवीस लाखांचा निधी

आता करायला या आमच्या मरणाचा विधी....

•••

11.तफावत

रोज सकाळी उठल्यापासून
प्रत्येक गोष्टीत आठवतात आठवणी गावाच्या घरातल्या

ब्रशने दोन ठिकाणी किडलेले दात घासताना
आठवतात, आई-बा चे कणखर दात राखुंडीने घासलेले

टॉयलेटमध्ये बसल्यावर कोंदट श्वास घेत
आठवते, गावाकडली मोकळ्या वासरासारखी हुंदडणारी हवा

टेबल-खुर्चीवर अभ्यास करताना फॅनच्या वाऱ्याखाली
आठवते, फुटक्या छपरात बसलेली उन्हातली आजी

महिन्याभरच्या कामाच्या पगाराचा घेताना चेक
आठवतो, रानात दिवसभर राबणाऱ्या रोजगाराचा घाम

मुंगीच्या रांगाप्रमाणं सतत वाहणारा रस्ता ओलांडताना
आठवतो, गावातला मोकळा-चाकळा रस्ता

शहरातलां प्रदूषण मिश्रित श्वास घेताना
आठवतो, गावच्या हृदयातील मोकळी स्वच्छ हवा

रस्त्यावर मोटारीच्या धडकेनं इव्हळत पडलेल्या भिकाऱ्याकडं पाहिल्यावर
आठवतो, गावातला माणुसकीचा झरा...

•••

12.किर्र ...... किर्र......

ढोरं वळत हिंडत्याती माझे समवयस्क
डोक्यात घोंघावत नाही त्यांच्या
विचारांच वादळ,
झोप येती त्यांना पडल्या-पडल्या
छपरात मोकळ्या मनान खेळणाऱ्या
वाऱ्यासारखी त्यांची मन...

रोज तेच,
दिवस-काम-रात्र
नाही बदल कधीच
त्यांनाही नकोसा वाटतोय
तरी सुखात

पण, मी शिकलो
आत्मभान-आत्मशोध-अन्याय वगैरे वगैरे
बरेच काही
मनात माझ्या खोलवर घुसलयं

त्यांची प्रत्येक गोष्ट
मी काढीत होतो मोडीत
अंधश्रद्धेच्या नावाखाली
विज्ञानाच्या आधारावर
दुसरीकडे मात्र, माझं वेडपणं वाढल्याची

चर्चा चालू होती कट्टया-कट्ट्यावर...

रोज रात्री झोपताना
अनेक वादळे, महापूर, दंगली यांना द्यावे लागते तोंड
मध्यरात्री लागते कधीतरी झोप

प्रत्येक गोष्टीचा केल्यामुळं विचार
मी झालोय बेजार
दररोज किर्र....किर्र.... ओरडणाऱ्या
जिवासारखां.......

•••

13.सगळं कसं वरवरचं खोटं

कागदावर रेघा ओढल्यागत
सोप नसतं रानातनं तास मारताना

पानांपानांवर डोलणारी पिके,
मनसोक्त हिरवं कुरणं चरणारी गुरे,
आनंदाने बांधावर हिंडणारा शेतकरी,
रानातल्या पाटातनं बारमाही फिरणार पाणी,
वाऱ्याच्या झुळकीवर तृप्तीची ढेकरं देऊन वामकुक्षी घेणारी शेतकरीण,

यासारख्या सगळं आज
वरवरचं खोटं ठरलयं

पानांपानांवर करपू लागली पिके,
माळावर गवत शोधणारी खुब्या आत गेलेली गुरे,
दुःखाची लाट डोक्यावर घेऊन फिरणारा शेतकरी,
आ.... वासून बसलेली जमीन वाट बघते पाण्याची,
वारा उन्हात दिवसभर राबून रात्रीही चिंतेत झोपणारी शेतकरीण,

यासारखं मन कुळविणारं
घडतयं खरं खरं.....

•••

14.उत्स्फूर्त

जमतं नाही तुमच्या सारखी मला दुर्बोध कविता
करताही येत नाही संस्कृत प्रचुर कविता
ओढून-ताणून आणताही येत नाहीत अलंकार यमक
उतरत नाही माझ्या काव्यात गेयता
आन्, हाताला लागत नाही
कवितेत माझ्या कोणताच काव्यविचार.

फक्त-

माझ्या कवितेच्या प्राणात आपोआप धावतो धबधबा
दिन-दलितांच्या, कुणब्यांच्या आन् शोषितांच्या दुःखांचा

भूकंपातील ज्वालामुखीसारखं खदखदणारं
काही एक रसायन,
येतं माझ्या काव्यातनं उत्स्फूर्तपणे...

•••

15.अजून थोड्या क्षणापुरतं

आहेस कुठे तू ईश्वरा ?
हे मला खरचं ठावूक नाही
पण, तुझ्यावर श्रद्धा आहे निश्चितच

आहे माझी एक विनंती तुझ्याकडं
अजून थोड्या क्षणापुरतं
मला तू जगवं...

नाहीतर,
वर गेल्यावर आत्महत्या केलेले कुणबी
आयुष्यभर फक्त कागदावरच काळं केलं,
म्हणून बडवतील
म्हणतील, कुणब्या पोटी येऊन घालविली वाया पिढी

मला कुणब्यांसाठी काय तरी करण्याचं दे बळ
त्याचं काम केल्याचं मिळू दे सगळ्याला फळ
अजून थोड्या क्षणासाठी,
कुणब्यांसाठी तू पळ....
कुणब्यांसाठी तू पळ....
•••

16.हुंदडत चाललेली चळवळ

दलित पँथरच्या चळवळीच्या बोर्डावरचा पाहिल्यावर वाघ
पूर्वीसारखा आता दिसत न्हाय
त्यानं फोडलेली डरकाळी
आसमंत भेदत होती कधी काळी
पण, ती आज शेळीसारखाचं आवाज काढतेयं
याचं कोडं त्या वाघालाचं सुटनायं
आपल्या सारख्या सामान्यांच तरी काय.

परवा रस्त्यावरनं जाताना,
एक त्या चळवळीतला भेटला कार्यकर्ता
हातात पाकीट घेऊन निघाला होता सुपारी करिता

तेव्हा मला अचानक शेळीच्या आवाजाचा लागला अर्थ
तेव्हापासून मी चळवळीला
कायमचा रामराम ठोकला.

•••

17.कामगारांनो

कामगारांनो,
जागे व्हा, उठा
घेऊनी सत्ता आपुल्या हाती
लोकशाही सजवू किती

कामगारांनो,
कळू द्या सर्वांना तुमचे कार्य,
होऊ द्या सर्वांचे उघडे कर्म,
मनात येतो बंडाचा धर्म,

कामगारांनो,
अन्याय कुणावर करू नका
अन्याय कुणावर होऊ देऊ नका
सर्वांना जगवा समानतेने

कामगारांनो,
देऊन सर्वांच्या सत्ता हाती
खुशाल तुम्ही बसू नका
सावध व्हा, सावध रहा...

•••

18.कामधंदा

ना काम ना धंदा
होऊनी सर्वांचा पोशींदा
नाही स्वतःचा उद्योग धंदा

होतो दुसऱ्याजवळ लाचार
नाही त्याला जिवाचा इचार
पण करतो सर्वांचा विचार

याचा नाही भरवसा
सर्वांना देऊनी वसा
पसार होतो कसा
हाच याचा कामधंदा.......

•••

## 19.विश्वासघात

मित्र म्हणून समजत होतो
तोच माझा शत्रू होतो

मित्रत्वाची जाण न त्याला
काय अर्थ त्या जीवनाला

मित्र म्हणजे एकरूपता
मित्र म्हणजे समरूपता

सख्खा मित्र म्हणूनी टाकला विश्वास पूर्ण
केला त्याचा घात तू संपूर्ण

या जगती खरा,
खरा तो एकची मित्र
सूर्य हाच सर्वांचा मित्र.

•••

20.निसर्ग

निसर्गातला प्रत्येक क्षण
असतो हा महत्त्वपूर्ण
करावया आपुले जीवन
आनंदित पूर्ण.

मानवाच्या हातूनी होतो
जीवनाचा ऱ्हास
कधीच न उरतो
जीवनाचा भरवसा.

सळसळती पाने निसर्गाची
पाहूनी होते मन आनंदी
निसर्गाचा हा चमत्कार भारी
मानवा पावहेना कोणी.

जीवनातला हा अमुल्य ठेवा
मानवाला कळेना थोडा
म्हणून वाटे देवाला हेवा.

•••

21.कीर्ती

कर्मवीरांची गाऊ किती कीर्ती
सारे जीवन पडते कमी
गोरगरिबांसाठी झटला तुम्ही
मार्ग दाखविला स्वावलंबी

आपुल्या लहानशा वटवृक्षाच्या
विश्वात पसरवल्या मुळ्या
खरचं होता तुम्ही
या देशाचे सच्चे कीर्ती स्तंभ

दुसऱ्यासाठी देह झिजवला
कर्मवीर हे अमर झाले
ज्यांना काहीच येत नव्हते
त्यांना शिकवून मोठे केले

जातियतेला तडा देऊनी
विश्वात पुरली समानता
अण्णा तुमची ओळख करून देताना
'गोरगरिबांचा कैवारी' हेच उचित ठरते

हृदयामध्ये साठवण आहे तुमच्या कार्याची
हीच गाथा तुमच्या यशाची.

•••

22.इशारा

तू पाहणारच नसशील तर
माझ्या इशाऱ्यांना काय अर्थ...

तू पाहणारच नसशील तर
माझ्या बघण्याला काय अर्थ...

तू पाहणारच नसशील तर
माझ्या जीवनाला काय अर्थ...

तू वाचणारच नसशील तर
माझ्या लेखणीला काय अर्थ...

तू ऐकणारच नसशील तर
माझ्या बोलण्याला काय अर्थ...

तू समजणारच नसशील तर
माझ्या प्रेमाला काय अर्थ....

•••

## 23.बेरोजगारांचा महामेळा

सरकारच्या इच्छेवर भरतो कधी-कधी बेरोजगारांचा मेळा
सर्वजण होतात इथून तिथून गोळा

स्पर्धा परीक्षेचं निमित्त असतं या महामेळ्याचं कारण
कोणीच येत नाही तिथं विनाकारण

त्यानिमित्त होतात गाठीभेटी
प्रत्येक परीक्षेवेळी तोच प्रश्न
कधी लागते नोकरी?

अभ्यास करून, परीक्षा देऊन थकलेलं
स्पर्धेच्या युगात भरडलेलं, चिरडलेलं
शरीर व मन
गोळा करत फिरतो शासनाच्या हुकूमावर
कोणीच घेत नाही त्याला कामावर

मेळ्याच्या ठिकाणी निघतात गप्पा
कुणी म्हणतं- तीन परीक्षा दिल्या...कुणी पाच तर कुणी दहा

कुणी म्हणतं, होत नाही काम दिल्याबिगर टक्का
गरिबाचं लेकरू फिरतं असचं बेवारस
म्हणून म्हणतो,
कुणी नसतो त्याला वाली
तो करतो आयुष्यभर दुसऱ्याची हमाली.

•••

24.भारत हा सत्ताकारण देश आहे

शाळेत लहानपणी भारत माझा देश आहे
हे नेहमी म्हणत आलो, ऐकत आलो
आज कळतय हा देश फक्त राजकारण्यांचा

कळतं नव्हतं तेव्हापासून भारत हा कृषिप्रधान देश आहे
हे नेहमी म्हणत आलो, ऐकत आलो
आज कळतयं हा देश फक्त सत्ताकारण्यांचा....

•••

25.शेतकऱ्यांनो तुम्हीच बना...

सारखं सारखं राजकारण्यांच्या
नावानं ओरडण्यापेक्षा
शेतकऱ्यांनो तुम्हीच घ्या हातात राजकारण

मग,
कुणब्यांचं राज्य
वाईट सगळं करून ताज्य
घडवूया देश मस्त

सारखं सारखं भांडवलाच्या
नावानं ओरडण्यापेक्षा
शेतकऱ्यांनो तुम्हीच निर्मिती करा भांडवलाची

मग,
कोणत्याही कामाला
धंद्याला,
अडसर येणार नाही कार्याला,

शेतकऱ्यांनो तुम्हीच बना
सर्वज्ञ! सर्वज्ञ!

•••

26.मेंदू नसणारी माणसे...

खूपच बडबड, भेटीगाठी करून
निवडणुकीत निवडून आला
'शेतकऱ्यांचा मुलगा' म्हणून
भांडवलरूपी संचितान विधानसभेत गेला

अजूनही रस्ता त्याच गावचा
दुखावरल्या खपलीसारखा
पडून आहे केव्हाचा
कोणीच वाली नसल्यासारखा

गावात शिरल्यानंतर
स्वागत होतं सुगंधाने
निर्मल ग्रामनंतर
सगळ्या योजनाचं केल निव्वळ धनं

गावात आले जलस्वराज्य
पण नियोजन हुकल्यामुळं
घाणं पाण्याचं वाढलं साम्राज्य
मेंदू नसणाऱ्या माणसांमुळं

रोजगाराशिवाय
मिळत नाही अन्न
होर्डिंगशिवाय

राजकारण होत नाही स्थानापन्न

मेंदू नसणारी माणसे
भलभलचं करतात
त्यामुळे माझ्यासह
फुले-आंबेडकरांचे विचार गुदमरतात...

•••

## 27.खेडे व शहर भाग – एक

घोर गर्दीच्या ठिकाणी आल्यावर
पिवर गावठी शब्दांचे पांघरूण
मी हळूहळू विसरत चाललो होतो
म्हणे आमच्या ग्रामजीवनाची
चर्चा होत रतत घोर गर्दीत
ती आमच्यापर्यंत येतच नाही कधी.

भरून वाहणाऱ्या रस्त्यावरून
सहजपणे, सफाईदार पद्धतीने वाट काढणारा मी
गावाकडचे ढेकळांनी भरलले रान
ओलांडताना होते दमछाक

चिंचोळया हायटेक पुलावरून जाताना
ढासळत नाही माझा तोल
पण, असंद बांधावरून जाताना
मात्र फिरतो मी गोल

विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगामुळे
शहरात दिसतो रासायनिक पदार्थांचा धूर
तो अव्याहतपणे चालू असतो
पैशांसाठी!

मात्र आमच्याकडे दिसतो धूर

पण तो दिवसा आणि रात्रीच थोडावेळ

फक्त भाकरीसाठी..... फक्त भाकरीसाठीच.......

•••

28.खेडे व शहर भाग- दोन

शहरात राहयला आल्यावर
मोकळं चाकळं चालण्याची अपेक्षा ठेवू नका रस्त्यांवर

सकाळी कामावर जाताना
बस थांब्यावर अर्धापाऊण तास थांबण्याची सवय असू द्या
मिळालीच लवकर तर,
उभे राहत, धक्के खात गर्दीत जाण्याची तयारीही राहू द्या.

कामावर जायला दररोज घाईच असते,
खबरदार, असे म्हणालं तर-
शाळेत मुलांना नेहमी सोडायचे असते
नाहीतर, रस्त्यावरची यांत्रिक तुफान गर्दी
घेऊन जाईल कायमची मुलाला भूतकाळात

म्हणूनच घराबाहेर पडताना
जीव, इज्जत वैगेरेसारख्या गोष्टी खुंटीला टांगून घ्याव्यात.

कुणाच्या जीवाची हमी देता येत नाही
कधी काय घडलं काय सांगता येत नाही.

शहरात प्रदूषण मिश्रित श्वास मिळतो
म्हणून तक्रार केली तर बघा,
नाहीतर खेड्यातील मोकळया

माळावर बेकारीचा शिक्का मारून हाकलून दिले जाईल

स्वतःची जागा, फ्लॅट, गाडी
यांची अपेक्षा ठेवू नका
आधीच तुमच पद वर्ग चार मधलं
पण शहर मात्र फाईव्ह स्टार मधलं

प्रत्येक वस्तू, भाजी घेताना
दुप्पट पैसा देण्याचा नियमच आहे
भेसळरहित, ताजी, चांगली हे शब्द
शहरातून कधीच माणसांनी बाहेर हाकललेत
याचं दुःख तुम्ही वाटून घेऊ नका

कधी मनाला एकांत हवा असेल
तर तो मिळण्यासाठी शहरात जागा नसेल
म्हणून फार चिडचिड बनू नका
जरा जन्मगावी सुट्टी काढून जाऊन या
नंतर तयार रहा पुढच्या न संपणाऱ्या
न आवडणाऱ्या,
दिनक्रमाला तोंड देण्यासाठी.....

•••

29.आत्महत्येचं पीक

होऊन कर्ता कुटुंबाचा
कधीच बुजवू शकला नाही खड्डा भांडणाचा

जेमतेम पाच माणसे घरात
पण सगळेच दुसऱ्यांच्या दारात

विसाव्यासाठी नावापुरते होते घर
वायली राहिल्याने त्यात नव्हते 'घर'पण

खड्डा भांडणाचा बुजविण्याचा प्रयत्न केला गावाने
यश दिले नाही त्याला देवाने

झालं व्हायचं तेच शेवटी
आत्महत्येचं पीक निघाले घराभोवती...

•••

30.पावसासारखं...

लागत नाही ओळख कुठल्याच प्रदेशात पावसाला
जगभर ओळखतात पाऊस 'आ'ला
तोही करत नाही भेद कधी जाति-धर्माचा, प्रदेशाचा
म्हणूनच असावा का हा विश्वव्यापीपणा त्याच्या जीवनाचा

पण, मी तर कधी केला नाही भेद माणसा-माणसांत
तरीही पाऊल ठेवण्याआधी मला का द्यावी लागते ओळख.

म्हणूनच आयुष्यात व्हावसं वाटत पावसासारखं....
•••

31.रसानं

रसानं पडल्यावर
वाटत वेगळ घडल्यागत
पिवळ्या उन्हाचा
सगळ्या निसर्गाचा
सुंदर देह पडतो डोळा
पाहण्यासाठी जीव होतो गोळा

फक्त तेव्हाच!
दिवस घालतो सोन्याचा अलंकार
कास्तकऱ्यांनाही असते खुश खबर...

•••

32.काळे कावळे आणि पांढरे बगळे

गरिब, अडलेल्या, नडलेल्यांला
कामानिमित्त आलेल्यांला
या ना त्या कारणाने
बोलावून घरट्यात आपल्या
काळे कावळे काढतात त्यांच्या दुःखावरल्या खपल्या

या कावळ्यांची घरटी असतात
प्रत्येक कट्ट्यांवर
कोर्ट व कचेऱ्यांच्या दरबारात
शासनाने त्यांना दिलेल्या असतात सवलती
मोकळं रान चरण्याच्या

टपून बसलेली असतात एक डोळा लावून
अनेक शिकार खाऊन
भरत नाही त्यांचे पोट कधीच
कारण सगळ्या श्वापदांचे गुण त्यांच्यामधीच

कुऱ्हाड लावली काळ्या कावळ्यांच्या
बेताल चरण्यावर
तर, मदतीला येतात पांढरे बगळे

पांढऱ्या बगळ्यांना एवीतेवी
केलेली असते मदत

प्रत्येक वेळी विकताना संविधान
म्हणून त्यांच्या डोळ्यांमध्ये असते समाधान

दोघांचीही असते ऐकी
ठोकतात ते कुठेही मेकी
त्यांच्याच हातात असतो कायदा
करून घेतात ते स्वतःचा फायदा

म्हणून,
म्हणून,
या कावळ्या-बगळ्यांच्या गाफिलपणे नका लागू नादी
नाहीतर होऊन जाईल तुमची गादी

जर-
करायचाचं असेल उठाव
त्यासाठी करावा लागेल ठराव
हरेक शोधून ठिकाण
कावळ्यांचे अन् बगळ्यांचे
एकाच वेळी, एकाच क्षणी
दिले पाहिजेत उडवून
मोठा बॉम्बस्फोट घडवून.

•••

## ३३.डिजिटलावरली माणसं

लेकीचं हुंड्यामुळे मोडलेल्या लग्नाची चिंता
मुलांच्या शिक्षणासाठी विकलेल्या वावराचं दुःख
आई बापाची, बायकोची अधुरी स्वप्ने-
अणुबॉम्बच्या स्फोटाप्रमाणं उडून गेल्याची खंत
दररोजचा पोटाच्या भूकेचा प्रश्न
रोजगाराच्या, हमीभावाच्या ग्यारंटीचा सवाल
आन् स्वतःचं आयुष्य बुडलेलं
गुलामीच्या विहरित, याचा त्रास...
        -हे कुठेच कसं दिसत नाही
         डिजिटलातल्या माणसांच्या चेहऱ्यात
म्हणून मी शोधतोय!
डिजिटलातली माणसं या खऱ्या दुनियेत
काहीतरी प्रश्न, दुःख सुटतील या आशेने

पण... ती माणसं मी कुठे कुठे शोधू
कारण, ती असतात तकलादू-

•••

34.मातीतून...

याच मातीच्या कणां-कणांत
माझं विस्कटलेलं बालपण, तरूणपण
जाड भिंगांच्या चष्म्यातून शोधताना
मनातल्या मनात हरस्त मन
आन् बुडतं त्या आठवणीतं...

विचारा त्या बांधावरच्या
लिंबाच्या झाडाला
माझ्या दुपारच्या जेवणाची चव
आन् उंबराला घोरण्याची सवय

वरच्या बांधावरचं उंबराच झाड
आज पडलय एकट
त्याच्या शेजारच्या रामफळीची चव
आज नष्ट झालेय जिभेवरनं

याच मातीनं माझं बालपण घडवलं
याच मातीनं माझं शिक्षण पेललं
याच मातीनं मला स्वाभिमानी बनवलं
याच मातीनं मला पायावर उभं केलं
याच मातीनं मला कष्टाचं मोल दिलं

म्हणून-

मातीतनं सोनं उगवतं

ते काय खोटं न्हाय

कारण, याच मातीतून माझं सोन्याचं आयुष्य उगवलं...

•••

35.रस्त्यांची तहान

माणसांच्या जंगलातील रस्त्यांची तहान
वाढतच चालतेय दिवसेंदिवस
माणसांच्या विधींप्रमाणे बनलीय ही तहान
म्हणूनच, पेपरमध्ये अखंडित येतात बातम्या
रस्त्यावर मेलेल्या माणसांच्या...

कळत नाही यात दोष कुणाचा
परंतु जीव जातो कित्येकांचा

रक्ताचे लोंढे, किंचाळया, रडारड पाहून
रस्त्यांच्या काळजाला पाझर का फुटत नसेल?
का माणूसच हैवान झाला असेल!

एनएच, एसएच रस्त्यांची तहान व्हीएचपेक्षा मोठी
यावर तुटेल कधी कुणाच्या आयुष्याची दोरी
याचा भरवसा नाही घरोघरी

रस्त्यांच्या दुनियेत चुकीला नाही स्थान
ज्याची चुकी नाही तोही होतो निशाणा
यात चुकी रस्त्यांची, माणसांची की कुणाची!
हेच कळत नाही माणसांच्या जंगलांना.

•••

36.खोडवा ऊस

शाळेत जात होतो नित्यक्रमानं
मातीत उभा होता खोडवा ऊस म्हणून
बापाच्या कष्टानं ऊसासोबत केलं होतं उभा
कष्ट, कर्ज यातून नव्हती कसलीच मुभा

सोसायटयाचं कर्ज येत होत घरात
खोडव्या ऊसातच पोराचं भवितव्य बघत
एक-एक दिवस होता ढकलत

हमीभावाचा प्रश्न न सोडवल्यानं
चाललं होत आंदोलन
पण सोईस्कररित्या -मी त्यातला नाही
भूमिका घेत चालत होतं सरकार

रागानं खोडव्या ऊसाचा मालक म्हणाला,
पोराला माझ्या साहेब करायचाय
तेवढ्यात झाला गोळीबार...

दरवर्षी ऊस प्रश्नावरून घडत होते मावळ
पण याद राखा साल्यांनो
एक दिवस-
हातात तलवार घेऊन मंत्रालयात घुसणारा
खोडवा ऊसाचा मालक

तेव्हा नवल करू नका
कारण, खोडव्या ऊसानं पचविले असतात
कोयत्याचे वार आन् अग्नीच्या ज्वाळा.

•••

37. इथं

इथं जगायचा अधिकार नाही प्रत्येकाला
घटना, संविधान, स्वातंत्र्य, अधिकार
असल्या गोष्टी उरल्यात लिखाणापुरत्या

खबरदार!
बोललात भ्रष्टाचाराबद्दल
घोटाळ्याबद्दल
नीचपणाबद्दल
आन् माणसांच्या हैवानाबद्दल

तुझी खाणगी होईल कत्तलखाण्यात
नाहीतर होईल दाभोळकर.

•••

३४. स्वप्नं

मोठाली स्वप्नं मनात घेऊन
बाप रानात जात बारमाही
शिवार घालताना नजरेखालून
बापाचा चेहरा सुकलेल्या चिपाडागत व्हायचा

आवंदा पेरली व्हती खाण्यापुरती ज्वारी
ती बी गेली वाटण्यात उसनवारी

धीर धरून लावलं परत मकवान
मक्याच्या भावासाठी राजकारणी झाले हैवान

पोटाला चिमटा घेत पेरला व्हता गहू
चंद्रभागेच्या पुरात तो गेला वाहून

कसल्याचं पिकात बळ नाही म्हणून
लई बळ करून लावला होता ऊस
पण पाण्यानं बदलली आपली कूस

म्हणून कसलचं पीक न घेता
फायद्याचं राहण्याचं कास्तकरी शिक्षण घेत होता.

•••

३९. मातीच्या राजा

मातीनं बदललीय कूस
माणसाप्रमाणं...
म्हणून सावध हो मातीच्या राजा
नाहीतर वाजेल तुझाही बाजा

पावलापावलांवर टपलेत हिंस्त्र प्राणी
तुझ्यासकट जमीन करण्यासाठी गिळंकृत

तू घाबरू नकोस!
कासोडयात लपवून ठेव सुरी

थोडावेळ तुलाही सोडावा लागेल माणुसकीचा धर्म
त्यातूनच होईल चांगले कर्म

आता, नुस्ती शेती पिकवून होणार नाही तुझा उद्धार
त्यासाठी करावा लागेल धोंडा होण्याचा निर्धार.

•••

40. शिक्षक

प्रस्थापित सत्ताधाऱ्यांनी हेरलं शिक्षकाला
चोहोबाजूंनी करूनी त्याची कोंडी
भ्रष्टाचार, लाचारीत बुडविली त्याची मुंडी

शिक्षकाने वाईट व्यवस्थेविरूद्ध करू नये आक्रोश
नाहीतर होईल सत्तेचा प्रकोप

मुलांना शिकवताना करावा विचार
नदीच्या प्रवाहाचा...

वेळ पडती तर,
ओळखून काळाची स्पंदन
सोडून द्यावीत सर्व बंधने
आन् हातात घेऊन बंदूक
लिहिली पाहिजे बाराखडी
लिहिला पाहिजे इतिहास
माणसांमधील हैवानाचा.

•••

41. फक्त

नसते हातात सत्ता
मिळतही नाही इतर प्रकारचा भत्ता
कशावरही नसतो मक्ता
पण,
करू नये तू चिंता
फक्त गिरवत रहा महापुरूषांचा कित्ता...

•••

42. जागतिकीकरणानं

शेती-वाडी कुरवाळत बसण्यापेक्षा
कष्ट आन् घाम गाळण्यापेक्षा
हमीभावासाठी
आंदोलन-मोर्चे काढण्यापेक्षा
पोटासाठी इतरांचे उंबरे झिजवण्यापेक्षा

जागतिकीकरणानं
सुपिक शेतीपेक्षा मोल दिलं नापिकीला
एकर-हेक्टर पेक्षा किंमत आहे एन.ए.च्या गुंठ्यांला
आणि भांडवलदारांच्या प्रकल्पाला.

•••

43. केला प्रयत्न

केला प्रयत्न सशासारखा पळून जग जिंकण्याचा
तर कासव होऊन हरवतील तुला

केला प्रयत्न समाजात चांगले विचार पेरण्याचा
तर सोडतील तुझ्यावर मारेकरी फुल्यांप्रमाणे

केला प्रयत्न धर्मसुधारणेचा मनुष्य उद्धारासाठी
तर करतील बहिस्कृत आंबेडकरांप्रमाणे

केला प्रयत्न प्रस्थापितांच्या अन्याय-अत्याचाराला संपविण्याचा
तर शहीद करतील संभाजीराजांप्रमाणं

ऊठ,
यामुळं असा होऊ नको धीरगंभीर
सोडू नको साथ खंबीरपणाची
प्रामाणिकपणाची,

कारण,
चांगली पण उदाहरणे आहेत इतिहासात
फक्त
लढत
रहा
तुझाही काळ येईल...

•••

## 44. षंढ

प्रत्येक सरकारी कार्यालयात
भेटता षंढ माणसे
शेतकरी आणि आडल्या-नडल्याल्यांच्या
तोडांतील घास काढून घेणारी

त्यांना विसर असतो
एके काळी आपणही होतो त्याच कुळातले

चांगल्या पिकाभोवती फास आवळलाय
माजलेल्या तणानं
प्रत्येक रानामध्ये

शेवटी तणही षंढच असतं म्हणा
दुसऱ्याच्या जिवावरच जगणारं...

•••

45. नोंद

पोटाला चिमटा घेऊन
हौस-मौज न करून
कष्टानं माग सारून ठेवलेल्या पैशानं
केला वावराचा विस्तार

वाटलं आपल पिक वाढलं
उत्पन्नही वाढलं
शिकतील लेकरबाळं
आन् पोरी-ठोरींची होतील लग्नं

पण वावराचा विस्तार नोंदावयाला
शेलकी पिके खाणारी आडदांड
जनावरं बसलेत कार्यालयात

नोंदीसाठी मागतात ढगळून प्रेम
असा वावर विस्तार
नोंदीसाठी
अडवलेल्या
जनावरचा
        तत्काळ वाजविला पाहिजे गेम.

•••

9 789356 199934